# महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद

(महाराष्ट्र शासनाचा उपक्रम)

**Maharashtra Prathamik Shikshan Parishad**

**(Govt. of Maharashtra Undertaking)**


**जा. क्र. मप्राशिप/सशिअ/REMS/२०१७-१८/७३७८** **दिनांक : 16 JUN 2017**

**विषय: <u>संशोधन, मूल्यमापन, पर्यवेक्षण व संनियंत्रण उपक्रमाच्या अंमलबजावणीबाबत.</u>**

सर्व शिक्षा अभियानांतर्गत संशोधन, मूल्यमापन, पर्यवेक्षण, संनियंत्रण या लेखाशिर्षाखाली खालील उपक्रमासाठी दिनांक ०९/०२/२०१७ रोजीच्या भारत सरकारच्या प्रकल्प मान्यता मंडळाच्या बैठकीतील इतिवृत्तात राज्य स्तराकरिता तरतूद मंजूर आहे.

- प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत विद्या प्राधिकरण, पुणे यांचेमार्फत सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शैक्षणिक गुणवत्तेचे मूल्यमापन करण्यासाठी ३ चाचण्या घेण्यात येणार आहेत.
- भारत सरकारच्या शाला सिद्धी या कार्यक्रमांतर्गत सर्व शाळांनी स्वयंमूल्यांकन करणे.
- राज्य बालहक्क संरक्षण आयोगामार्फत शिक्षण हक्क कायद्यातील तरतुदीच्या अंमलबजावणीचे संनियंत्रण करणे.

वरील कार्य विचारात घेता, जिल्ह्याकरिता मंजूर असलेले संशोधन व दस्ताऐवज सहाय्यकाचे पद शैक्षणिक गुणवत्तेच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे. त्याप्रमाणे कामाची योग्य ती जबाबदारी त्यांच्याकडे देण्यात यावी.

विविध शैक्षणिक संशोधन, अभ्यास व त्यावर आधारित परिणाम मिळालेल्या शैक्षणिक बाबींशी संबंधित यशोगाथा त्यामध्ये केस स्टडीज्, व्हिडीओज्, Testimonials, इत्यादी उल्लेखनीय बाबींचे मराठी व इंग्रजीमध्ये दस्ताऐवजीकरण (Documentation) करून या कार्यालयास सादर करावे. जेणेकरून ते भारत सरकारच्या SSA Shagun या पोर्टलवर अपलोड करण्यासाठी सादर करण्यात येईल.

**(नंद कुमार भा.प्र.से.)**
**राज्य प्रकल्प संचालक,**
**म.प्रा.शि.प., मुंबई.**

**प्रति,**

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
२) आयुक्त, महानगरपालिका (सर्व).

**<u>प्रत : माहितीस्तव,</u>**

१) मा. मंत्री, शालेय शिक्षण विभाग यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
२) मा. प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.

**<u>प्रत : माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव,</u>**

१) आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) शिक्षण संचालक (प्राथमिक), प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४) संचालक, महाराष्ट्र विद्या प्राधिकरण, पुणे.
५) विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
६) प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यावसायिक विकास संस्था, सर्व जिल्हे.
७) शिक्षणाधिकारी (प्राथमिक / माध्यमिक), जिल्हा परिषद (सर्व).
८) शिक्षण प्रमुख / शिक्षणाधिकारी / प्रशासन अधिकारी, महानगरपालिका (सर्व).




Jawahar Bal Bhavan, Netaji Subhash Marg, Charni Road, Mumbai - 400 004.
Tel. : 022-236 36 314, 236 79 267 Fax : 022-236 36 315 Email : mpspmah@vsnl.com, mpspmah@gmail.com